महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ४६ वा दिनांक : ११/११/२०२४ वार : सोमवार

## देशातील ओबीसीसह एससी, एसटी आरक्षण संकटात: मनोज जरांगेंच्या मागणीला विरोध करा — प्रकाश आंबेडकर



**बीड :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांची बीड जिल्ह्यातील माजलगाव येथे प्रचार सभा पार पडली. वंचितचे उमेदवार शेख मंजुर चाँद साहब यांच्या प्रचारार्थ ही सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी बोलताना प्रकाश आंबेडकर यांनी ओबीसी आरक्षण आणि मनोज जरांगे यांच्या मागणीबाबत थेट भाजपला आव्हान दिले आहे.

सभेत बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, देशातील ओबीसी आरक्षण संकटात आहे, याच सोबत एससी आणि एसटीचे आरक्षण देखील संकटात आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालात एससी आणि एसटी आरक्षणात क्रिमिलेअर टाकण्यात आले आहे. यामुळे एका कुटुंबात एकाच व्यक्तीने एकदा आरक्षणाचा लाभ घेतल्यास ते कुटुंब क्रिमिलेअरमध्ये येते. क्रिमिलेअरमध्ये जो असेल त्याला आरक्षण लागू होणार नाही. हे तुम्हाला मंजूर आहे का? असा सवाल प्रकाश आंबेडकर यांनी केला. पुढे ते म्हणाले, काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी आणि दोन्ही शिवसेनेने आरक्षणाबाबतच्या निर्णयाला पाठिंबा दिला, नवी समिती स्थापन केली, तुम्ही त्यांना मतदान दिले तर ते काय करतील? असा देखील प्रश्न प्रकाश आंबेडकर यांनी उपस्थित केला. मनोज जरांगे यांच्या मागणीबद्दल बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, भाजपने मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीला विरोध आहे अशी भूमिका घ्यावी. जरांगे पाटील यांची जी मागणी आहे मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी आहे त्याला विरोध आहे हे जाहीरपणे सांगावे. मात्र, भाजप यावर काय म्हणते? जरांगे पाटील यांची जी मागणी आहे त्याला पाठिंबा आहे. तुमचा पाठिंबा आहे तर आमचे वाटोळे का करून घ्यायचे आहे? असा प्रश्न ओबीसी समाज विचारत आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, ओबीसी समाज म्हणतोय आमचे वाटोळे करून का घेऊ? महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्यांनी ओबीसी समाजाला प्रतिनिधी दिला नाही. हे लक्षात घ्या, विधानसभेत आमदार पाठवायचा असेल अत्र उमेदवार पाहिजे. उमेदवार नाही तर आमदार कसा जाणार, तिथे निर्णय घेतला तर ओबीसी आरक्षण कसे वाचवणार? असा सवाल आंबेडकर यांनी उपस्थित केला.

## बाहेरून पक्षात येणाऱ्यांसाठी ट्रेनिंगची गरज — नितीन गडकरींनी व्यक्त केली भावना



**मुंबई :** महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या ११ दिवस आधी केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी बंडखोरांबाबत वक्तव्य केले आहे. गडकरींना शनिवारी एका मुलाखतीत बंडखोर भाजपमध्ये प्रवेश करण्याबाबत विचारण्यात आले होते. त्याला उत्तर देताना गडकरी म्हणाले- भाजपचा विस्तार झपाट्याने होत आहे. पीक वाढले की त्यासोबत रोगही वाढतात. भाजपकडे भरपूर पीक आहेत, जे चांगले उत्पादन देतात, परंतु काही रोग देखील आणतात. त्यामुळे अशा आजारी पिकांवर कीटकनाशकांची फवारणी करावी लागते.

गडकरी म्हणाले की, भाजपमध्ये नवीन लोक वेगवेगळ्या कारणांसाठी येत आहेत. त्यांना प्रशिक्षण देणे, विचारधारा सांगणे आणि त्यांना कार्यकर्ता बनवणे ही आपली जबाबदारी आहे. हजार कार्यकर्ते उभे असतात, पण कधी कधी एक कार्यकर्ता काहीतरी बोलतो आणि त्या हजार कार्यकर्त्यांच्या मेहनतीवर पाणी फेरते.

गडकरींना विचारण्यात आले की, लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील पराभवानंतर नड्डा आणि अमित शहा यांनी महाराष्ट्रातील भाजप नेत्यांच्या अनेक बैठका घेतल्या, परंतु ते या बैठकांना उपस्थित नव्हते. त्यावर गडकरी म्हणाले- महाराष्ट्रात माझी कोणतीही भूमिका नाही. येथील नेते सक्षम आहेत. जेव्हा त्यांना माझी गरज असेल तेव्हा मी उपलब्ध असेल.

गडकरी पुढे मुलाखतीत म्हणाले की, सरकार आणि प्रशासन धर्मनिरपेक्ष असले पाहिजे. एखादी व्यक्ती धर्मनिरपेक्ष असो वा नसो, पण राज्य, सरकार आणि प्रशासन हे धर्मनिरपेक्ष असले पाहिजे. याशिवाय आर्वी येथील निवडणूक सभेत गडकरींनी काँग्रेसवर ग्रामीण भागाचा विकास होत नसल्याचा आरोप केला.

गडकरी म्हणाले- काँग्रेसने ग्रामीण भारताच्या विकासाचा कधीच गांभीर्याने विचार केला नाही. ग्रामीण भारताला प्राधान्य दिले असते तर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नसत्या आणि खेड्यात गरिबी नसती. भारताच्या ७५ वर्षांच्या इतिहासात काँग्रेसने ग्रामीण भागाच्या विकासाकडे सातत्याने दुर्लक्ष केले आहे.

## मविआचा जाहीरनामा ५ गॅरंटी, महिलांना ३ हजार रुपये महिना, बेरोजगारांना ४ हजार

महाविकास आघाडीने रविवारी महाराष्ट्र निवडणुकीसाठी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. MVA ने त्याला 'महाराष्ट्रनामा' असे नाव दिले आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, महाराष्ट्राच्या विकासाचे पाच स्तंभ आहेत. महाराष्ट्राचा विकास आणि प्रगती कृषी, ग्रामीण विकास, उद्योग आणि रोजगार, शहरी विकास, पर्यावरण आणि लोककल्याण यावर आधारित असेल.

खरगे म्हणाले- आम्ही पाच हमी देत आहोत आणि त्या संपूर्ण महाराष्ट्राच्या कल्याणासाठी असतील. आम्ही प्रत्येक कुटुंबाला वार्षिक ३ लाख रुपयांची मदत देऊ. महालक्ष्मी योजनेतून महिलांना दरमहा ३ हजार रुपये दिले जाणार आहेत. महिलांसाठी बससेवा मोफत असेल. ज्या शेतकऱ्यांनी वेळेवर कर्जफेड केली आहे, त्यांना आम्ही ५० हजार रुपये देऊ.

**महाराष्ट्रासाठी मविआची ५ गॅरंटी कुटुंब रक्षणासाठी विमा** — कुटुंबाला २५ लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य विमा. **महालक्ष्मी योजना** — महिलांना दर महिन्याला ३ हजार रुपये आणि महिला व मुलींसाठी मोफत बस सेवा.

**कृषी समृद्धी** — शेतकऱ्यांचे ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन **युवकांना मदत** — बेरोजगार तरुणांना दर महिन्याला ४ हजार रुपयांपर्यंतची मदत. **समानतेची हमी** — जातनिहाय जनगणना आणि आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवणार.

**खरगे म्हणाले - लाल पुस्तक केवळ संदर्भ, संविधाना नाही, पंतप्रधानांना शाळेत प्रवेश देणे आवश्यक**

जाहीरनामा प्रसिद्ध केल्यानंतर खरगे यांनी माध्यमांच्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितले की, राहुल गांधींसह अनेक काँग्रेस नेत्यांनी लाल पुस्तकाचा वापर केवळ संदर्भासाठी केला आहे. हे संपूर्ण संविधान नाही. काँग्रेस अध्यक्ष म्हणाले- मोदींनी २६ जुलै २०१७ रोजी तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना अशीच एक प्रत दिली होती. त्यांनी दोन्ही नेत्यांची छायाचित्रे दाखवली.

लाल पुस्तक दाखवत खरगे म्हणाले की, मोदी आणि भाजप म्हणत आहेत तसे ते कोरे नाही. पंतप्रधान मोदींनी पुन्हा प्राथमिक शाळेत जाणे आवश्यक आहे. पंतप्रधान स्वतः राष्ट्रपतींना लाल रंगाचे संविधान देतात आणि आम्हाला शहरी-नक्षल म्हणतात.

**महायुती सरकारला टोला - डबल इंजिन सरकार रुळावरून घसरले**

जाहीरनामा प्रसिद्ध केल्यानंतर काँग्रेस अध्यक्षांनी पुन्हा एकदा महाराष्ट्रातील विद्यमान महायुती सरकारवर निशाणा साधला. खरगे म्हणाले - सरकारचे डबल इंजिन रुळावरून घसरले आहे. सुशासनासाठी महायुती सरकारचा पराभव करणे आणि महाविकास आघाडीला पाठिंबा देणे हे महाराष्ट्रासाठी महत्त्वाचे आहे.

खरगे म्हणाले- मविआच्या जाहीरनाम्यात ग्रामीण आणि शहरी विकास आणि शेतीच्या विकासावर भर देण्यात आला आहे. जातीची जनगणना ही लोकांमध्ये फूट पाडण्यासाठी नाही तर त्यांना अधिक फायदे मिळावेत, यासाठी विविध समुदाय कसे ठेवले गेले आहेत, हे समजून घेण्यासाठी आहे.

**मविआने जाहीरनाम्यात केल्या खालील घोषणा**

- महिलांसाठी शक्ती कायद्याची अंमलबजावणी करणार
- जन्मलेल्या प्रत्येक मुलीच्या नावे बँक खात्यात रक्कत ठेवणार, १८ वर्षांनंतर १ लाख देणार
- MPSC चे वेळापत्रक जाहीर करून ४५ दिवसांत निकाल लावणार
- महाराष्ट्रात जातीनिहाय जनगणना करणार
- ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्यांचे १०० युनिटचे बील माफ करणार
- महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न देण्याची मागणी करणार
- महालक्ष्मी योजनेच्या माध्यमातून महिलांना महिन्याला ३ हजार रुपये देणार
- ६ गॅस सिलेंडर प्रत्येकी ५०० रुपयांत उपलब्ध करून देणार
- सुशिक्षित बेरोजगारांना ४ हजार रुपयांपर्यंत भत्ता
- महिलांसाठी एसटी बससेवा मोफत
- शेतकऱ्यांचे ३ लाखांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचे आश्वासन
- २५ लाखांची आरोग्य विमा योजना लागू करणार
- प्रत्येक कुटुंबाला महिन्याला ३ लाखांची आर्थिक मदत
- सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणार
- २५ नगरपालिकांच्या न झालेल्या निवडणुका आमचे सरकार आल्यावर करणार.
- संजय गांधी योजनेतील लाभार्थ्यांना दीड ऐवजी दोन हजार रुपये.
- राज्यातील अडीच लाख सरकारी रिक्त पदे भरणार
- राज्यात सुक्ष्म व लघु उद्योगांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करणार
- महिला कर्मचाऱ्यांना मासिक पाळीच्या दिवसांमध्ये २ दिवसांची ऐच्छिक रजा.
- शिवभोजन थाळी योजना केंद्राची संख्या वाढणार
- महायुती सरकारने पक्षपाती भूमिकेतून काढलेल्या अध्यादेशांचा फेरविचार करणार
- सरकारी रुग्णालयात मोफत औषध उपलब्ध करून देणार
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर करणार

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ११ नोव्हेंबर २०२४


## भय संपेना... कळंकी शिवारात बिबट्या कडून गोर्ह्या ची शिकार



**कन्नड (अरुण थोरात):** कळंकी ता. कन्नड शिवारात बिबट्या ने दि. १० नोव्हेंबर रोजी पहाटे च्या सुमारास एका गोर्ह्या ची शिकार केली आहे. तसेच हा बिबट्या शेतपरिसरात नजरेस पडल्याने भीतीचे वातावरण आहे.कळंकी येथील हिंगणमळी शिवारातील गट क्र. ८१ मधील शेतकरी संताराम कारभारी थोरात यांच्या गोठ्यातील गोर्ह्या ची शिकार केली आहे. कळंकी शिवारात बिबट्या कडून पाळीव जनावरांची ही दहावी शिकार आहे. पशुपालक शेतकरी संताराम थोरात यांचे पुतणे रमेश थोरात हे सकाळी जनावरांना चारा पाणी करण्यासाठी गेले असता. त्यांना बांधलेल्या जनावरांपैकी एक गोर्हा कमी दिसल्याने व इतर जनावरे भेदरलेली दिसली. त्यावरून त्यांनी शोध घेतला असता. सदरील गोर्ह्या ची शिकार करुण जवळील ऊसात फरपटत नेल्याच्या खुणा दिसल्या. तसेच फरपटीत रक्त व मांसाचे तुकडे दिसल्याने त्यांनी आजूबाजूच्या शेतकऱ्यांना माहिती दिली. तसेच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना कळविले. वनमजूर देविदास राठोड यांनी तरुणांच्या मदतीने ऊसात गोर्ह्या चा शोध घेतला असता. सुमारे शंभर मीटर अंतरावर अर्धवट खाल्लेली मृत नजरेस पडले.

तसेच जवळ बिबट्याचा पावलांचे ठसे ही आढळून आले. शेतकरी संताराम थोरात यांचे पूतणे सुदाम थोरात हे सकाळी १०:४५ वा. घटनास्थळा जवळील विहिरी वरील कृषी वीज पंप चालू करण्यासाठी गेले असता. ऊसात लपलेल्या बिबट्या त्यांच्या समोर आला. आरडाओरड केल्याने हा बिबट्या पुन्हा ऊसात निघून गेला. सदरील घटनेचा प्रा.वन विभागाचे वनरक्षक पी.जी. लकडे यांनी पंचनामा केला असून या परिसरात एकटे दुकटे न जाता समूहाने जाण्याचे तसेच पाळीव जनावरे सुरक्षित स्थळी बांधण्याचे अवाहन केले आहे. या घटने मुळे परिसरातील शेतकरी, पशुपालकांत भीती चे वातावरण आहे. सध्या कापूस वेचणी व पीकांना पाणी देण्याचे दिवस असल्याने बिबट्या च्या भीतीने मजूरांची वनवा भासत आहे. याकडे वनविभाग व शासनाने लक्ष देऊण रात्रीचे भारनियमन रद्द करावे. शेतीला तारकुंपन व गायगोठे बांधून देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## दारुबंदी नको असलेला उमेदवार आम्हालाही नको; ३०९ गावामध्ये ठराव पारित

**गडचिरोली :** राज्यात विधानसभा निवडणुकीचे वातावरण तापायला सुरूवात झाली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील तिन्ही विधानसभा क्षेत्रातून उमेदवारांनी प्रचाराला धडाक्यात सुरूवात केली आहे. तर दुसरीकडे जिल्हाभरातील एकूण ३०९ गावांमध्ये मुक्तिपथ व शक्तिपथ गाव संघटनेच्या नेतृत्वात मतदारांनी ठराव घेत आपला नेता दारूबंदीचा समर्थक असावा. ज्याला दारुबंदी नको, तो उमेदवार आम्हाला नको असा निर्णय घेतला आहे.

मागील ३१ वर्षापासून गडचिरोली जिल्ह्यात दारूबंदी टिकून आहे. यासाठी गडचिरोली जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते, महिला-पुरुषांनी विशेष परिश्रम घेतले आहे. निवडणुकीच्या काळात मतदारांना दारूचे प्रलोभन घालून मत मागणाऱ्या उमेदवारांमुळे विकासाला खीळ लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. दारूबंदीचे समर्थन करणारा उमेदवार असल्यास गावाची किंबहुना जिल्ह्याची दारूबंदी टिकून राहते, मजबूत होते. मतदानाच्या काळात दारू नसेल तर भांडणे शक्यतो होत नाही, शांततेच्या वातावरणात मतदान प्रक्रिया पार पडते. विकासासाठी निवडून दिलेल्या उमेदवाराला जाब विचारता येतो. त्यामुळे उमेदवारांकडून दारूचे वाटप होऊ नये यासाठी मुक्तिपथ-शक्तीपथ गाव संघटनेच्या माध्यमातून गावागावांमध्ये ठराव घेऊन आपला उमेदवार कसा असावा, मतदारांचे कर्तव्य आदी बाबी पटवून दिल्या जात आहेत.

निवडणुकीसाठी उभा राहणारा उमेदवार गाव व जिल्हा दारूबंदीचा समर्थन करणारा असावा. आमचे मत हवे असल्यास दारूबंदी समर्थनाचे लिखित वचन निवडणुकीत उभे असणाऱ्या उमेदवाराला आम्हाला द्यावे लागेल. वचन न देणाऱ्या नेत्याला, उमेदवाराला आम्ही मत देणार नाही. स्वतः दारू पिणारा नसावा, निवडणुकीच्या पूर्व काळात व निवडणुकीच्या दिवशी दारू वाटप करू नये. निवडणूक शांततेत पार पाडावी, दारू वाटप करणाऱ्याला आम्ही मत देणार नाही. दारूच्या नशेत मतदान करून अयोग्य उमेदवार निवडला जावू नये, याची काळजी सर्वांनी घेतली पाहिजे. इत्यादि विविध मुद्दे चर्चा करून ठरावात घेण्यात आले. यानुसार दारूबंदीचे समर्थन करणाऱ्या उमेदवारांनाच आम्ही मत देणार असा ठराव मतदारांनी घेतला आहे.

## सुनील टिंगरेंनी पवारांना पाठवलेली नोटीस सुळेंनी आणली समोर : सत्तेतील लोक धमक्या देत असल्याचा केला आरोप



**पुणे :** पोर्शे कार अपघात प्रकरणी आमदार सुनील टिंगरे यांनी शरद पवार यांनी नोटीस पाठवली होती, असा मोठा गौप्यस्फोट सुप्रिया सुळे यांनी एका सभेत केला होता. यानंतर मी शरद पवारांना कोणतीही नोटीस पाठवले नसल्याचे सुनील टिंगरे यांनी सांगितले होते. त्यानंतर सुप्रिया सुळे यांनी आज सुनिल टिंगरेंनी शरद पवारांना पाठवलेली नोटीस पत्रकार परिषदेत सर्वांसमोर दाखवली. राजकारणात सध्या सत्तेत असलेल्या लोकांकडून धमक्या दिल्या जात असल्याचा आरोपही सुप्रिया सुळे यांनी यावेळी केला.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, सुनील टिंगरे यांनी सांगितले की मी कोणतीही नोटीस पाठवली नाही. यामुळे या नोटीसची कॉपी मी आणली आहे. यामध्ये शरदचंद्र पवार यांचे नाव आहे. त्यांच्या नावानीशी ही नोटीस १५ ऑक्टोबर रोजी पाठवण्यात आली आहे. त्या पक्षाचे प्रमुख शरद पवार यांना नोटीस पाठवली आहे. त्यात पोर्शे कार अपघात प्रकरणात बिनशर्त माफी मागण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. आता आम्ही कशासाठी माफी मागावी. आमदार टिंगरे पोर्शे कार अपघात प्रकरणात पोलिस ठाण्यात गेले होते, हे पोलिसांनी मान्य केले आहे. माध्यमांमध्ये त्या बातम्या आल्या आहेत. त्याबाबत ही नोटीस दिली आहे.

**धनंजय महाडीक आणि भाजपचा घेतला समाचार**

सुप्रिया सुळे यांनी धनंजय महाडिक यांच्या विधानावर प्रतिक्रिया दिली आहे. धनंजय महाडीक यांची केलेल्या विधानाचा मी निषेध करते. महाराष्ट्रातील महिलांना धमकी देण्याची हिंमत होतेच कशी? महिलांना अशा प्रकारच्या धमक्या देणे खपवून घेणार नाही. कोणतीही महिला कोणत्याही पक्षाच्या सभेला किंवा प्रचाराला जाऊ शकते. संविधानाने त्यांना तो अधिकार दिला आहे. भाजप स्वत:च्या खिशातून पैसे देत नाही. जर राजकीय सुडापोटी त्या महिलांचा कोणताही शासकीय निधी बंद केला, तर गाठ आमच्याशी आहे, असा इशाराही सुप्रिया सुळे यांनी भाजपला दिला आहे. धनंजय महाडीक यांनी केलेल्या वक्तव्याप्रकरणी महिला आयोगाने देखील दखल घ्यावी, अशी मागणी सुळे यांनी केली आहे.

**नेमके प्रकरण काय?** सुप्रिया सुळे यांनी बापू पठारे यांच्यासाठी घेतलेल्या सभेमध्ये सुनील टिंगरे यांनी शरद पवार यांना नोटीस पाठवल्याचा गौप्यस्फोट केला होता. 'पोर्शे कार दुर्घटनेत ज्या आई-वडिलांचे एक मुलगा आणि एक मुलगी गेली त्यांचे अश्रू आजही थांबलेले नाहीत. इथल्या स्थानिक नेत्यांनी पोर्शे कार ज्याची होती त्या आरोपीला बिर्याणी आणि पिझ्झा खायला घातला हे वास्तव आहे. तुम्ही या दुर्घटनेच्या केसमध्ये माझी बदनामी केली, तर मी तुम्हाला कोर्टात खेचेन. अशी नोटीस पोर्शे कार दुर्घटनेमधील आरोपींना मदत करणाऱ्या नेत्यांनी शरद पवार यांना पाठवली, असे सुप्रिया सुळे यांनी सांगितले होते.

**सुनील टिंगरे यांचे स्पष्टीकरण** माझ्याकडून साहेबांना कोणतीही नोटीस बाजवण्यात आलेली नाही. मध्यंतरी एका प्रकरणात अनेक पार्टीचे नेते लीडर आणि प्रवक्त्यांनी माझ्यावर अनेक वक्तव्य केले त्यातून माझी बातमी करण्यात आली, लोकांमध्ये गैरसमज तयार करण्यात आले. आता विधानसभा निवडणुकीच्या काळात अशा पद्धतीने चुकीचा प्रचार होऊ नये या हेतूने मी महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षांना नोटीस देऊ आपण शहानिशा न करता चुकीच्या माहितीच्या आधारे माझ्यावर कुठल्याही वक्तव्य करू नये अशा पद्धतीची नोटीस मी त्यांना दिली आहे. वैयक्तिक साहेबांना कोणतीही नोटीस दिली नाही, असे स्पष्टीकरण सुनील टिंगरे यांनी दिले होते.

## कपिल शर्माच्या कॉमेडी शोमध्ये सिद्धू दिसणार परत, राजकारणापासून दुरावले



**अमृतसर :** क्रिकेटर बनलेले राजकारणी नवज्योत सिंग सिद्धू लवकरच द ग्रेट इंडियन कपिल शोमध्ये दिसणार आहेत. जवळपास २२ वर्षांच्या राजकीय प्रवासानंतर नवज्योत सिद्धू २०२२ पासून राजकारणापासून दूर आहेत. आयपीएल २०२४ ची सुरुवात झाल्यानंतर, ते क्रिकेट कॉमेंट्रीद्वारे छोट्या पडद्यावर परतले. आता त्यांनी पुन्हा एकदा लाफ्टर शोमध्ये परतण्याचे संकेत दिले आहेत.

नवज्योत सिंग सिद्धू यांनी त्यांच्या सोशल मीडिया अकाउंट X वर एक व्हिडिओ शेअर केला आहे. ज्यावर त्यांनी लिहिले आहे — द होम रन. एवढेच नाही तर त्यांनी जो व्हिडिओ शेअर केला आहे त्यावर लिहिले आहे- सिद्धू जी परत आले आहेत.

त्यांच्या पोस्टमधून स्पष्ट संदेश आहे की आता क्रिकेट कॉमेंट्रीनंतर शकतात. पुलवामा हल्ल्यानंतरच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे नवज्योत सिंग सिद्धू यांना कपिल शर्मा शोमधून काढून टाकण्यात आले होते.

**अर्चनाच्या खुर्चीवर बसले सिद्धू** सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये नवज्योत सिंग सिद्धू अर्चना पूरण सिंह यांच्या खुर्चीवर बसलेले दिसत होते. व्हिडिओमध्ये दाखवण्यात आले आहे की, सिद्धूची एंट्री होताच प्रेक्षक आनंदाने उड्या मारतात, मग कपिल म्हणतो- मी काय म्हणत होतो... दरम्यान, तो नवज्योत सिंग सिद्धूला पाहून आश्चर्यचकित झाला कपिलला म्हणतो- नीट बघ, मी नवज्योत सिंग सिद्धू आहे. यानंतर अर्चना पूरण सिंह धावत येतात आणि कपिलला म्हणतात- सरदार साहेबांना माझ्या खुर्चीवरून उठायला सांग. बसले आहेत.

**नवज्योत सिंग सिद्धू यांची सोशल मीडिया पोस्ट..**

**कपिल शर्मा शोमधून सिद्धू बाहेर** पुलवामा हल्ल्यावर वादग्रस्त वक्तव्य केल्यानंतर नवज्योत सिंग सिद्धू यांना कपिल शर्मा शोमधून काढून टाकण्यात आले होते. सिद्धूच्या जागी अर्चना पूरण सिंग यांची वर्णी लागली. पुलवामा दहशतवादी हल्ल्यानंतर सिद्धू यांनी पाकिस्तानचे समर्थन केले होते. यानंतर शोच्या निर्मात्यांनी त्यांना काढून टाकण्याचा निर्णय घेतला. मी अजूनही माझ्या विधानावर ठाम असल्याचे ते म्हणाले होते. देश आधी येतो आणि मैत्री नंतर पण काही भ्याडांमुळे संपूर्ण पाकिस्तानला दोष देता येणार नाही, असे ते म्हणाले.

**शोमध्ये परतण्याचे कारण काय?** सिद्धू काँग्रेसमध्ये पूर्णपणे एकाकी पडल्याचे राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे. पंजाब प्रदेश काँग्रेसमध्ये त्यांना महत्त्व दिले जात नाही. जवळपास २ वर्षांपासून ते पक्षापासून पूर्णपणे अलिप्त आहेत. याशिवाय पक्षाच्या हायकमांडवरील त्यांची पकडही कमकुवत झाली आहे. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत पराभूत झाल्यापासून ते राजकारणात सक्रिय दिसले नाहीत. एवढेच नाही तर विधानसभा निवडणुकाही जवळपास अडीच वर्षांवर आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ११ नोव्हेंबर २०२४


## लाडक्या बहिणींबाबत केलेल्या विधानावरून निवडणूक विभागाची धनंजय महाडिकांना नोटीस



**कोल्हापूर** : लाडक्या बहिणींना धमकावणे खासदार धनंजय महाडिक यांच्या अंगलट आले आहे. कोल्हापूर दक्षिण येथे एका प्रचार सभेत केलेल्या आक्षेपार्ह विधानासाठी भाजपचे खासदार धनंजय महाडिक यांना निवडणूक विभागाकडून नोटीत पाठवण्यात आली आहे. यामुळे धनंजय महाडिक यांच्या अडचणींत वाढ होण्याची शक्यता आहे.

कोल्हापूर दक्षिण येथे अमल महाडिक यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत धनंजय महाडिक यांनी भाषण देताना भारतीय न्यायसंहिता-२०२३ चे कलम १७९ अन्वये आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे निवडणूक विभागाकडून त्यांना नोटीस पाठवण्यात आली आहे. याबाबतचा खुलासा तत्काळ करावा, अशी नोटीस निवडणूक निर्णय अधिकारी कोल्हापूर दक्षिण यांनी पाठवली आहे.

**काय म्हणाले होते धनंजय महाडिक?** काँग्रेसच्या सभेला जर महिला दिसल्या तर जाऊन फोटो काढायचे. फोटो आमच्याकडे द्या, त्यांची व्यवस्था करतो. घ्यायचे आपल्या शासनाचे आणि गायचे त्यांचे असे चालणार नाही. कोण लय बोलायला लागली किंवा दारात आली तर तिला फॉर्म द्यायचा आणि यावर सही कर म्हणायचे आम्ही पैसे लगेच बंद करतो, असा थेट इशारा धनंजय महाडिक यांनी दिला होता. आमच्याकडे काय पैसे लय झालेले नाहीत. आम्ही दुसऱ्या गरीब महिलेला देऊ, पण असा दुगलेपणा इथून पुढे चालणार नाही. त्यामुळे आपण जागृत राहिले पाहिजे, असेही धनंजय महाडिक म्हणाले होते.

**विरोधकांनी टीका केल्यानंतर मागितली माफी** धनंजय महाडिक यांनी महिलांबाबत वादग्रस्त वक्तव्य केल्यानंतर विरोधकांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली होती.

यानंतर धनंजय महाडिक यांनी दिलगिरी व्यक्त करत माफी मागितली. माझ्या वक्तव्याने कुठल्याही माता भगिनींचे मन दुखावले असेल, तर त्यांची मी बिनशर्त माफी मागतो. माझे हे वक्तव्य कुठल्याही माता भगिनीचा अपमान करण्यासाठी मुळीच नव्हते. तर निवडणूक काळात राजकीय प्रचार करताना विरोधी पक्षाच्या खोट्या प्रचाराला बळी पडणाऱ्या महिलांना लाडकी बहीण योजना ही फक्त महायुती सरकारमुळेच यशस्वी झाली असल्याचे ठामपणे नमूद करताना विशेषत: वोट जिहाद करणाऱ्या महिलांच्या प्रती आलेली स्वाभाविक प्रतिक्रिया आहे. महिलांचा सन्मान आणि सशक्तीकरणबाबत माझ्या ह्या प्रयत्नांची दखल घेऊन माझ्या वक्तव्याने मन दुखावलेल्या माझ्या भगिनी मला मोठ्या मनाने माफ करतील, अशी आई अंबाबाई चरणी मी प्रार्थना करतो, असे महाडिक म्हणाले.

## सरकार बदलल्याशिवाय शांत बसणार नाही - शरद पवार



**परांडा** : खासदार शरद पवार यांनी आज सकाळी परांडामध्ये जाहीर सभा घेतली. परांडा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल मोटे यांच्या प्रचारासाठी आयोजीत केलेल्या सभेत शरद पवार बोलत होते. यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले, काही लोकांनी आमची साथ सोडली. भाजपाच्या पंक्तीत गेले. अगोदर सांगत होते विकासासाठी गेलो, पण आता भुजबळ नावाचे मंत्री सांगत आहेत की, ईडीच्या भीतीने, मला तुरुंगात टाकले होते म्हणून आम्ही भाजपासोबत गेलो, एक प्रकारे लाचारीचे दर्शन घडले आहे. महाराष्ट्र स्वाभीमानी आहे, त्यासाठी तुमची साथ हवी आहे.

'सरकार बदलल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही'यावेळी शरद पवार म्हणाले, ओमराजे निंबाळकर मला तुमची गोष्ट अजिबात पटली नाही. तुम्ही मला या वयातही फिरतो म्हणालात. मी काय म्हातारा झालोय का? हे सरकार बदलल्याशिवाय मी म्हातारा होणार नाही. शांत बसणार नाही, असा निर्धार खासदार शरद पवार यांनी यावेळी केला.

भारतीय जनता पार्टी-महाराष्ट्रपरांडा विधानसभेची निवडणूक लक्षवेधी ठरत आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून राहुल मोटे तर महायुतीकडून शिंदे गटाचे डॉ. तानाजी सावंत निवडणूक लढवत आहेत. दोन दिवसापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या मतदारसंघात संभा घेतली, तर लगेच शरद पवार यांनी सभा घेतली आहे. यामुळे या मतदारसंघाची राज्यात चर्चा सुरू आहे.

## कॅश व्हॅनमध्ये तब्बल साडेसहा टन चांदीच्या विटा ; विकोळी पोलिसांसह केंद्रीय निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाकडून कारवाई

**मुंबई** : विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू असताना मुंबईतील विक्रोळी भागात एका कॅश व्हॅनमध्ये तब्बल साडेसहा टन चांदीच्या विटा सापडल्या आहेत. विकोळी पोलिसांसह केंद्रीय निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीला अवघे काहीच दिवस शिल्लक असताना मोठी बातमी समोर येत आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू असताना मुंबईतील विक्रोळी भागात एका कॅश व्हॅनमध्ये तब्बल साडेसहा टन चांदीच्या विटा सापडल्या आहेत. विकोळी पोलिसांसह केंद्रीय निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. चांदीच्या विटा पकडलेल्या या कॅश व्हॅनमध्ये चांदीच्या विटा सापडल्या असून या विटा एकूण साडेसहा टन इतक्या आहेत. ज्यांची किंमत करोडोंच्या घरात असल्याची माहिती मिळत आहे. कॅश व्हॅनमध्ये सापडलेल्या या चांदीच्या विटा मुलुंड मधील एका गोदाममध्ये ठेवण्यासाठी ब्रिंक्स या कंपनीच्या गाडीमधून चालल्या होत्या. यावेळी पोलीस आणि निवडणूक आयोगाच्या पथकाकडून या वाहनाची तपासणी करण्यात आली. या विटा अधिकृत असल्याची माहिती समोर आली निवडणूक आयोग, इन्कम टॅक्स, पोलीस याचा अधिक तपास करत आहेत.

## मविआचा जाहीरनामा युतीच्यायोजना चोरून-मुख्यमंत्री शिंदे:योजनांमुळे त्यांचे पोट दुखते



**परभणी** : महायुती सरकारने शेतकऱ्यांच्या वीजबिल माफीपाठोपाठ आता १० कलमीकार्यक्रमात कर्जमाफीचा निर्णय घेतला.तसेच लाडक्या बहिणींच्या खात्यात दरमहिन्याला २१०० रुपये जमा केले जाणारआहेत. विरोधकांनी आमच्याकल्याणकारी योजनांबद्दल अपप्रचारचालवला. लवकर खात्यात जमाझालेले पैसे काढा नाहीतर सरकारकाढून घेईल, असाही प्रचार केला. परंतुआमचे सरकार देणारे आहे, घेणारेनाही. कोणी कोर्टात जाऊ दे, कोणीकुठेही गेले तरी ही योजना बंद होऊदेणार नसल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले.

महायुती सरकारने सुरू केलेल्याकेलेल्या लाडकी बहीण योजनेसह तरुणवर्ग आणि शेतकऱ्यांसाठीच्या कल्याणकारी योजनांमुळे विरोधकांच्या पोटात दुखत आहे. लाडकी बहीणसाठीपैसे कुठूनआणणार? असा सवाल आम्हाला विचारणाऱ्या महाविकास आघाडीने आमच्या योजना चोरून आपला वचननामाबनवत महिलांना प्रतिमाह ३ हजार रुपये देण्याचे जाहीर केले आहे. मग त्यासाठीपैसा कुठून आणणार? असा सवालकरत आम्ही तर योजनेचे ५ हप्ते वाटप करूनही दाखवले. मात्र अशा प्रकारेकॉपी करून कुणीही पास होऊ शकतनाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथशिंदे यांनी विरोधकांचा समाचार घेतला.

विधानसभा निवडणुकीसाठी परभणीयेथे मुख्यमंत्र्यांची महायुतीची प्रचारसभाझाली त्या वेळी ते बोलत होते.व्यासपीठावर महायुतीचे परभणीमतदारसंघातील उमेदवार आनंद भरोसे,जितूर मतदारसंघाच्या उमेदवार आ.मेघना बोर्डीकर, विजय वरपुडकर,माजी आ. हरिभाऊ लहाने, प्रतापदेशमुख आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना मुख्यमंत्री शिंदे पुढेम्हणाले की, आमचे सरकार सत्तेवरआल्यास सर्व योजना बंद करत दोषीअसणाऱ्यांना तुरुंगात टाकू, असा इशारामहाविकास आघाडीवाले देत आहेत.हिंमत असेल तर या सर्व कल्याणकारीयोजनांची खुशाल चौकशी करावी.लाडक्या बहीण-भावांसाठी तसेचशेतकऱ्यांसाठी आपण एकदा नव्हे,शंभर वेळा तुरुंगात जाण्यास तयारआहात, असे शिंदे म्हणाले.

**काँग्रेसच्या दावणीचा धनुष्यबाण सोडवला**

शिवसेनेचा प्राण असलेला धनुष्यबाणकाही लोकांनी काँग्रेसच्या दावणीलाबांधला होता, तो सोडवून आणण्याचेकाम आम्ही केले. त्याची शानवाढवण्याचे काम आता करायचे आहे.परभणीच्या स्थानिक आमदारानेजनतेचा भ्रमनिरास केला असूनकाहीही काम करायचे नाही, दमडीचेकाम करायचे आणि त्याचे श्रेयलाटण्यासाठीच पुढे यायचे असाआरोप त्यांनी केला. त्यामुळेपरभणीला विकासाच्या वाटेवर नेऊनविकासाची पर्वणी साधा, असेआवाहनही त्यांनी केले.






## देवेंद्र फडणवीसांनी घेतली विनोद पाटलांची भेट

**छत्रपती संभाजीनगर** : एकीकडे मराठा आरक्षणावरून मनोज जरांगे सातत्याने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करत असताना आता फडणवीसांनी मराठा आरक्षण याचिकाकर्ते विनोद पाटलांची भेट घेतली. देवेंद्र फडणवीसांनी छत्रपती संभाजीनगर मध्ये विनोद पाटलांची भेटल घेतली. ही भेट राजकीय नसून कौटुंबिक असल्याच देवेंद्र फडणवीस म्हणाले. ऐन निवडणुकीच्यावेळी देवेंद्र फडणवीसांनी विनोद पाटलांची भेट घेतल्याने मराठवाड्यात भाजपचे चित्र बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

माध्यमांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विनोद पाटील हे आमचे मित्र आहेत. मराठा समाजाला आरक्षण द्यायचा विषय होता त्यावेळी विनोद पाटलांची विशेष मदत झाली. मराठा समाजाला आरक्षण कसं द्यायचं, कसं टिकवायचं याबाबत त्यांची मदत झाली. उच्च आणि सर्वोच्च न्यायालय याचिका असताना विनोद पाटलांनी मदत केली. त्यामुळे संभाजीनगरमध्ये असताना त्यांची भेट घ्यायला आलो. ही राजकीय भेट नाही तर कौटुंबिक भेट आहे.

**मराठा समाजाला न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न**

मराठा समाजाला आरक्षण दिलं नाही तर भाजपचे सर्व उमेदवार पाडू असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला. त्यावर प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "त्यांनी भूमिका मांडल्यावर आमची भूमिका मांडू. आम्ही आपलं काम करतोय. मी मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला आरक्षण द्यायचे प्रामाणिक प्रयत्न केले. आरक्षण दिलं आणि टिकवलं. आण्णासाहेब पाटील महामंडळाच्या माध्यमातून एक लाख तरुणांना रोजगार दिले. सारथीच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षेसाठी मदत केली."

आमचा दृष्टीकोन स्पष्ट आहे. संधी मिळाली त्यावेळी मराठा समाजाच्या विकासासाठी प्रयत्न केला. त्यामुळे कुणी किती टीका केली, वाद केला तरी त्याकडे दुर्लक्ष करतो असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. काँग्रेस-राष्ट्रवादीवर टीका करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "आमच्या समोर जे लोक आहे त्यांनी मराठा समाजासाठी काहीही केलं नाही. ४० वर्षे जे सत्तेत होते, त्यांनी कधीही मराठा आरक्षणाच्या विषयाला हात घातला नाही, कधीही प्रयत्न केला नाही. उलट मराठा समाजाला आरक्षणाची गरज नाही असं ते म्हणाले."

**विनोद पाटलांना संधी मिळणार का?**

मराठा आरक्षण याचिकाकर्ते विनोद पाटील हे संभाजीनगरमधून लोकसभा निवडणुकीसाठी इच्छुक होते. पण त्यावेळी महायुतीकडून त्यांना तिकीट मिळालं नाही. त्यावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राजकारणात एक निवडणूक कुणाचं भविष्य ठरवत नाही. योग्य वेळी योग्य गोष्टी घडतात. विनोद पाटील यांच्यामध्ये नेतृत्व गुण आहेत. त्यांनी सातत्याने राजकीय पेक्षा सामाजिक भूमिका स्वीकारली. जर पूर्णपणे राजकीय भूमिका स्वीकारली त्यावेळी चित्र वेगळं असेल.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ११ नोव्हेंबर २०२४


## फुलंब्रीत प्लास्टिक साहित्य दुकानाला आग : तिघांचा मृत्यू, दोन जण गंभीर जखमी



**फुलंब्री** : छत्रपती संभाजीनगर येथील फुलंब्री जवळील दरी फाटा येथे एका प्लास्टिक साहित्य विक्रीच्या दुकानाला भीषण आग लागली. या घटनेत तिघे जण जळून ठार झाले तर दोघे जण गंभीर जखमी झाले.

छत्रपती संभाजीनगरच्या फुलंब्रीमध्ये दरी फाट्यावर प्लास्टिक दुकानाला आग लागली. या घटनेत तिघांचा मृत्यू झाला आहे. रात्री दीड वाजेच्या सुमारास ही घटना घडली आहे. आग लागल्याची माहिती दुकान मालक व शेजारी असलेल्या दुकान मालकांना समजली असता ते दुकान उघडण्यास धावले. दुकानाचे शटर उघडताच आतमध्ये तयार झालेल्या गॅसमुळे तीन लोक वेगाने बाहेर फेकले गेले, यात ते लोखंडी पार्टवर आदळले तसेच आगीत होरपळले. तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर घाटीमध्ये उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नितीन रमेश नागरे, राजू सलीम पटेल, गजानन दादाराव वाघ यां तिघांचा मृत्यू झाला आहे. तर अजय सुभाष नागरे आणि शाहरुख पटेल हे गंभीर जखमी असल्याने त्यांच्यावर घाटी रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले आहे.

फुलंब्री येथे दरी फाटा भागात राजू स्टील आणि प्लास्टिक नावाचे दुकान असून या दुकानात मोठ्या प्रमाण प्लास्टिक साहित्य भरलेले होते. शनिवारी रात्री १ वाजून ३० मिनिटांनी दुकानातील आतील भागात शॉक सर्किट झाले. यामुळे या दुकानाला आग लागली. दुकानात प्लॅस्टिक असल्याने आगीने उग्र रूप धारण केले.

## 'भाजपवाल्यानो... आता पहिले तुमचीच मस्ती जिरवतो', महादेव जानकरांना संताप अनावर



भाजपाची मस्ती वाढली आहे. त्यांनी काय केलं शिवसेनेत फूट पाडली. यासोबत राष्ट्रवादी देखील फोडली. कुठला माणूस कुठं ठेवायचा नाही. आम्ही काय केलं होतं. आमचे एक दोन आमदार होते ते आमचे आमदार पण पळवले. आमचा आमदार निवडून येतो, आमच्या पक्षावर आणि तुम्ही भाजप बरोबर घेऊन जाता, असा हल्लाबोल राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी भाजपवर केला. आता पहिले तुमचीच मस्ती जिरवतो भाजपवाल्यानो... तुम्ही काळजी करू नका, असा खोचक टोलाही महादेव जानकर यांनी लगावला. पुढे ते असेही म्हणाले, काहीजण म्हणायचे महादेव जानकर असं काही खरं नाही पण महादेव जानकर बोलतो सांगतो तो पाळतो. मी चाळीस वर्षांपूर्वी सांगितलं होतं एक दिवस पंतप्रधान होईल मी आज माझी कॅबिनेट मिनिस्टर म्हणून तुमच्याकडे भाषण करत आहे. तेही माझ्या पक्षातून करत आहे. त्यांनी एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांना विचारलं. आम्हाला बोलवलं नाही जेवायला तर जायचं कशाला आम्ही स्वाभिमानी माणसं असल्याचे महादेल जानकर म्हणाले.

## विधानसभा निवडणुकीसाठी भाजपचा जाहीरनामा प्रसिद्ध; शेतकऱ्यांना कर्जमाफी, लाडकी बहीण योजनेच्या मानधनात वाढ; जाणून घ्या सर्व मुद्दे



विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरु केली आहे. त्या पार्श्वभूमीवर भाजपने मुंबईत पक्षाचा जाहीरनामा अर्थात संकल्पपत्र प्रसिद्ध केले आहे. भाजपने राज्यातील शेतकरी, तरुण, वृद्ध आणि महिलांसाठी अनेक महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भाजपच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन करण्यात आले. महायुतीची सत्ता आल्यास पहिल्या १०० दिवसांत 'व्हिजन महाराष्ट्र २०२९' हा रोडमॅप तयार करुन त्यानुसार वाटचाल केली जाणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले आहे.

या जाहीरनाम्यामध्ये वृद्ध पेन्शन धारकांना २१०० देण्याचे वचन देण्यात आले आहे. महाराष्ट्रात २०२७ पर्यंत ५० लाख लखपती दीदी करणार, महारथीमार्फत मोठ्या लॅब तयार करणार, गड किल्ल्यांच्या विकासासाठी प्राधिणीकरण, १ लाखांपेक्षा जास्त सरकारी नोकऱ्या देणार आहोत.

अंगणवाडी आणि आशा सेविकांना १५ हजार रुपये वेतन आणि विमा संरक्षण देणार, २५ लाख रोजगार निर्मिती करणार, महिन्याला १० लाख विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन देणार अशी आश्वासनं भाजपच्या या जाहीरनाम्यामध्ये देण्यात आली आहे.

भाजपच्या जाहीरनाम्यातील आश्वासने कोणती ?

— लाडकी बहीण योजनेतील महिलांना १५०० रुपयांवरुन २१०० रुपये दिले जाणार— महिलांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण— महिलांच्या सुरक्षेसाठी २५००० महिलांचा पोलीस दलात समावेश केला जाणार— शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि शेतकरी सन्मान योजनेतून वर्षाला १२००० रुपयांवरून १५००० रुपये— एमएसपीशी समन्वय साधत २० टक्क्यांपर्यंत भावांतर योजना राबविण्यात येईल.— प्रत्येक गरीबाला अन्न आणि निवारा देण्यात येणार— वृद्ध पेन्शन धारकांना १५०० वरुन २१०० रुपये दिले जाणार— जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवणार— २५ लाख रोजगार निर्मिती करणार— महिन्याला १० लाख विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन— ग्रामीण भागात ४५ हजार गावात पांधण रस्ते बांधणार— महाराष्ट्रात कौशल्य जनगणना करण्यात येणार— छत्रपती शिवाजी महाराज आकांक्षा केंद्र स्थापन करण्यात येणार. यात को वर्किंग स्पेस, इनक्युबेशन सुविधा असतील. यातून १० लाख नवीन उद्योजक तयार केले जाणार आहे.— अंगणवाडी आणि आशा सेविकांचे मानधन वाढ करुन त्यांना दर महिना १५ हजार वेतन आणि विमा संरक्षण देणार— वीज बिलात ३० टक्के कपात करुन सौर आणि अक्षय ऊर्जेवर भर देणार— सरकार स्थापनेनंतर १०० दिवसांच्या आत व्हिजन महाराष्ट्र @२०२९ सादर केले जाणार— २०२८ पर्यंत महाराष्ट्राला १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्याचे लक्ष्य— मेक इन महाराष्ट्र धोरण राबवणार— महाराष्ट्राला जागतिक फिनटेक आणि कृत्रिम बुद्धीमत्ता (AI) राजधानी बनवणार— पहिल्या विशेष AI विद्यापीठाची स्थापना करणार— नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर आणि नाशिकला आधुनिक एरोनॉटिकल आणि स्पेस उत्पादन केंद्र बनवणार— शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतांवरील जीएसटी अनुदानाच्या रुपात परत देणार. शेतकऱ्यांना प्रति क्विंटल ६००० भाव मिळावा म्हणून सोयाबीन उत्पादन, प्रक्रिया आणि मूल्यवर्धनासाठी समर्पित संपूर्ण श्रृंखलेची स्थापन— २०२७ पर्यंत महाराष्ट्रात ५० लक्ष लखपती दीदी तयार करणार प्रत्येकी ५०० स्वयंसहायता गटाचे एक औद्योगिक क्लस्टर तयार करण्यात येईल आणि १००० कोटींचा प्रारंभिक फिरता निधी उपलब्ध करण्यात येणार— अक्षय अन्न योजनेतंर्गत कमी उत्पन्न गटातील कुटुंबांना दरमहा मोफत शिधा देण्यात येणार, यात तांदूळ, ज्वारी, शेंगदाण्याचे तेल, मीठ, साखर, हळद, मोहरी, जिरे आणि लाल मिरची पावडर यांचा समावेश असणार— महारथी अटल टिंकरिंग लॅब्स योजना सुरु करणार.


